## वर्धन घराणे

इ.स. ६ व्या शतकाच्या प्रारंभी पूष्यभूती याने स्थानेश्वर येथे वर्धन घराण्याची स्थापना केली. सध्या स्थानेश्वर पूर्व पंजाबमध्ये आहे. वर्धन घराण्यातील राजे शिवभक्त असून गुप्त साम्राज्याचे परंपरागत सरदार होते. त्यांनी हळूहळू आपले राज्य वाढविण्यास प्रारंभ केला. या घराण्यात नटवर्धन, राज्यवर्धन I, आदित्यवर्धन, प्रभाकर वर्धन, राज्यवर्धन II, हर्षवर्धन इत्यादी राजांनी राज्यकारभार केला.

**प्रभाकरवर्धन व राज्यवर्धन :-**

प्रभाकरवर्धनच्या काळात साम्राज्याचा विस्तार सुरू झाला. बाणभट्ट म्हणतो, 'प्रभाकरवर्धनाने माळवा, राजपूताना, सिंध हे प्रदेश जिंकून घेतले.' त्याने स्वतःला 'परमभट्टारक' ही पदवी घेतली होती. प्रभाकरवर्धनला १) राजवर्धन २) हर्षवर्धन ही दोन मुले तर ३) राजश्री ही मुलगी होती. राजश्रीचा विवाह कनोजचा बलवान राजा 'गृहवर्मा' याच्याबरोबर झाला होता. प्रभाकरवर्धनने आपल्या कारकिर्दीच्या शेवटी हुणांच्या आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी राज्यवर्धनास पंजाबच्या सरहद्दीवर पाठविले. तो मोहीमेवर असतानाच आकस्मात इकडे प्रभाकरवर्धनाचे निधन झाले. मोहीम अर्धवट सोडून राज्यवर्धन राजधानीस परत आला. त्याची आई (यशोमतीदेवी) सती गेली. हर्षवर्धनाच्या आग्रहामुळे दुःख बाजूला सारून राज्यवर्धन स्थानेश्वरचा राजा झाला. राजश्री व गृहवर्मा विवाहमुळे वर्धन घराण्याचे वाढलेले महत्त्व माळव्याचा राजा देवगुप्त व बंगालचा राजा शशांक यांच्या डोळ्यात सलत होते. देवगुप्तने राजश्रीच्या राज्यावर (कनोज) आक्रमण केले. अचानक उद्‌भवलेल्या युद्धात गृहवर्मा मारला गेला. राजश्रीला बंदी बनवले. ही बातमी राज्यवर्धनास कळताच तो देवगुप्तवर १०,००० सैन्यासह चालून गेला. त्यास ठार मारले. त्याचवेळी बंगालचा राजा शशांक याने राज्यवर्धनाशी वाटाघाटी सुरू केल्या. राज्यवर्धनाला आपली मुलगी देण्याची बोलणी सुरू केली. राज्यवर्धन बेसावध राहीला. शशांकने कपटाने राज्यवर्धनाला ठार मारले. अद्यापपावेतो राजश्रीने स्वतःची सुटका करून घेवून ती विंध्य पर्वताकडे निघून गेली. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये हर्षवर्धनकडे स्थानेश्वरचे राजपद आले.

**हर्षवर्धन :-**

हर्षवर्धनाचा जन्म इ.स. ५९० मध्ये झाला. प्रभाकरवर्धनाचा तो कनिष्ठ मुलगा होय. राज्यकर्त्याला आवश्यक असणा-या शस्त्र व शास्त्राचे गुण त्याच्या अंगी होते. आई-वडिलाच्या घराण्याकडून शौर्य व धैर्य तसेच संस्काराचा वारसा त्यास मिळालेला होता. त्यास

राज्यवर्धन हा थोरला भाऊ तर राजश्री ही बहिण होती. राज्यवर्धनाचा खुन झाला त्यावेळी त्याचे वय अवघे १६ वर्षांचे होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये हर्षवर्धन इ.स. ६०६ मध्ये स्थानेश्वरचा सत्ताधीश झाला. राज्यरोहणावेळी त्याचे वय केवळ सोळा वर्षांचे होते. त्याच्यासमोर अनेक अडचणी होत्या. १) भावाच्या मृत्युचा बदला म्हणून शशांकला धडा शिकविणे २) राजश्रीचा शोध घेणे ३) कनोजच्या वारसाचा प्रश्न सोडविणे. हे महत्त्वाचे प्रश्न प्रारंभी त्याच्यासमोर होते.

**१) राजश्रीचा शोध :-**

हर्षवर्धनाने भावाच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी शशांकवर चालून जायचे ठरविले. आसामचा राजा भास्करवर्मन याच्याबरोबर दोस्ती केली. हर्षवर्धनाचा सेनापती 'भण्डी' हा रणकुशल होता. दोघांच्या मदतीने शशांकवर चाल केली. शशांकच्या मोहीमेवर असतानाच राजश्रीच्या विंध्य पर्वतातील वास्तव्याची माहिती मिळाली. हर्षवर्धनाने मोहीमेची जबाबदारी भण्डीकडे सोपवून स्वतः राजश्रीच्या शोधासाठी निघाला. व्याघ्रकेतू, दिवाकर मित्र, भूमकंप, निर्घट इत्यार्दीनी हर्षवर्धनाला राजश्रीच्या शोधासाठी मदत केली. राजश्री सती जाण्याच्या तयारीत असतानाच हर्षवर्धन व दिवाकर मित्र (बौद्ध भिक्षू) तेथे पोहचले. सती जाण्यापासून राजश्रीचे मन वळविले. तीचे सांत्वन केले. राजश्रीला कनोजला आणण्यात आले.

**२) कनोजच्या वारसाचा प्रश्न :-**

राजश्रीला कनौजला आणल्यानंतर साम्राज्ञीला पाहून तेथील लोकांना आनंद झ ाला. ग्रहवर्माच्या अपघाती निधनामुळे आणि राजश्रीची कारभार करण्याची इच्छा नसल्यामुळे कनोजच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा मंत्रीमंडळाने हर्षवर्धनाला कनौजचे राजपद स्विकारण्याची विनंती केली. लोकांच्या आग्रहामुळे हर्षवर्धनाने 'युवराज शिलादित्य' म्हणून कनौजच्या प्रदेशाची व प्रशासनाची जबाबदारी स्विकारली. पुढे शशांकचा पराभव झाा यानंतर 'महाराज' उपाधी घेवून राजधानी स्थानेश्वरहून कनौजला आणली.

**३) शशांकवर स्वारी :-**

बंगालच्या प्रदेशात शशांकचे राज्य होते. शशांकच्या मदतीने देवगुप्ताने ग्रहवर्माला ठार मारले होते. शशांकचे वाढते वर्चस्व हर्षवर्धनाला आव्हान होते. हर्षवर्धनाने शशांकवर तीन वेळा आक्रमण केले असे म्हटले जाते. भंडी शशांकच्या राजधानीपर्यंत पोहचला. त्याची राजधानी जिंकून त्यास त्याच्या राजधानीत कैद केले. तथापी शशांकला ठार करता आले नाही. पुढे दोन मोहीमांत त्याने शशांकचा पराभव केला. त्याचे राज्य जिंकून घेतले. इ.स.

६३७ पर्यंत शशांक जिवंत असल्याचा उल्लेख सापडतो. हर्षवर्धनाच्या शौर्याबद्दल शशांकने पूर्वीच ऐकले होते. प्रचंड सैन्यासह हर्षवर्धन येत आहे हे पाहून शशांक बंगाल सोडून आराकनच्या पर्वतश्रेणीत पळून गेला. तिकडेच त्याचा खून झाला असाही उल्लेख सापडतो.


**४) पुलकेशी द्वितीय बरोबर संघर्ष :-**

हर्षवर्धनाचे राज्य हिमालयाच्या पायथ्यापासून नर्मदेपर्यंत व पूर्व पंजाबपासून पश्चिम बंगालपर्यंत विस्तारले होते. यातच मगध, उत्तरप्रदेश यांचा समावेश होई. हर्षवर्धनाने उत्तरभारतावर वर्चस्व स्थापन केल्यानंतर दक्षिण भारताकडे आपले लक्ष वळविले. या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस पुलकेशी दुसरा हा चालुक्य राजा राज्य करीत होता. त्याच्या वडीलाचे नाव कितीवर्मन प्रथम तर मंगलीश हा त्याचा चुलता होता. पुलकेशी दुसरा हा हर्षवर्धनाप्रमाणेच पराक्रमी असून त्यांची राजधानी बदामी होती. दक्षिण जिंकण्यासाठी त्याने प्रचंड सैन्य जमवले. चीनी प्रवासी हुएनत्संगच्या मते हर्षवर्धनाकडे सहा हजार हत्ती, वीस हजार घोडदळ, पन्नास हजार पायदळ होते. हे विशाल सैन्य घेवून हर्षवर्धन दक्षिणेकडे निघाला. पुलकेशी दुसरा व हर्षवर्धन यांच्यात नर्मदा नदी काठावर भीषण युद्ध झाले. हर्षवर्धन स्वतः सैन्याचे नेतृत्त्व करीत होता. तरीही त्याला विजय मिळाला नाही. पुलकेशी दुसरा विजयी झाला. त्याने स्वतः परमेश्वर ही उपाधी घेतली. कांहीच्या मते उभयतात समझोता होऊन नर्मदा नदी ही त्यांची सरहद्द ठरली. उभयतात नेमके काय झाले हे निश्चित सांगता येत नाही. मात्र पुलकेशी दुस-याच्या ऐहोळ स्तंभालेखावरून पहील्या मताला दुजोरा मिळतो. उभयतात झालेल्या युद्धाचा काळ आणि परिणामाबद्दल इतिहासकारामध्ये मतभेद आढळून येतात.

**५) बौद्ध धर्माचा विस्तार :-**

हर्षवर्धन स्वतः निष्ठावान शैव होता. त्याचा थोरला भाऊ राज्यवर्धन व बहीण राजश्री बौद्ध धर्मीय होते. बहीण राजश्री व तिच्या पतीचा मित्र दिवाकर मित्र (बौद्ध भिक्षु) यांच्या प्रभावाखाली हर्षवर्धन गेला. दरबारात ठेवून घेतलेल्या हुएनत्संग याचाही प्रभाव त्यावर पडला. शेवटी हर्षवर्धनाने महायान पंथाचा स्विकार करून बौद्ध धर्माचा तो अनुयायी बनला. त्याने आपल्या कारकिर्दीत बौद्ध धर्माचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न केले.

इ.स. ६४३ मध्ये हर्षवर्धनाने कनौज येथे महायान पंथीय बौद्ध धर्म परिषद आयोजित केली. चीनी यात्रेकरू 'हुएनत्संग' हा या परीषदेचा अध्यक्ष होता. या परिषदेसाठी हर्षवर्धनाने बौद्ध भिक्षूशिवाय जैन मुनी, हिंदू पंडीत यांनाही सहभागी केले होते. या परिषदेसाठी तीन




हजार बौद्ध भिक्षू व तीन हजार हिंदू पंडीत नालंदाहून आल्याचा संदर्भ मिळतो. सतत तेविस दिवस या परिषदेमध्ये महायान धर्म तत्त्वज्ञानावर मंथन झाले. दररोज शंभर फूट उंचीच्या आसनावर ठेवलेल्या तीन फूट उंचीच्या सोन्याच्या बुद्धमुर्तीची स्वतः हर्षवर्धन पूजा करीत असे. त्या अगोदर एका छोट्या बुद्धमुर्तीची हत्तीवरून वैभवाने मिरवणूक काढण्यात येई. स्वतः हर्षवर्धन इंद्राचा वेष धारण करून बुद्धमुर्तीवर छत्र धरीत असे.

या परिषदेच्या माध्यमातून हर्षवर्धनाने बौद्ध धर्माचा तळमळीने प्रचार आणि विस्तार केला. नालंदा, वल्लभी विद्यापीठातील बौद्ध चळवळ त्याच्या आश्रयातूनच सुरू झाली. बौद्ध धर्माला आश्रय देणारा तो शेवटचा राजा होय. बौद्ध धर्मात महायान पंथाचे महत्त्व वाढले होते. हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, कर्मकांड याचे अनुकरण करण्यात येत होते.

**६) धार्मिक धोरण :-**

सामाजिक पातळीवर विचार करता हर्षवर्धनाचे धार्मिक धोरण परधर्मसहिष्णू वृत्तीचे

होते. त्याचा वैयक्तिक पातळीवर धर्म विचारात घेता हर्षवर्धन प्रारंभी कट्टर शैवपंथीय होता. त्याचे वडील सुर्योपासक होते. हर्षवर्धन कनौजला स्थलांतरीत झाला तेव्हा राजश्री, दिवाकर मित्र, हुएनत्संग यांच्या विचाराचा प्रभाव पडून तो बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाला. त्याने महायान पंथ स्विकारला. या धर्माला राजाश्रय देवून त्याच्या प्रसारासाठी तन-मन-धनपूर्वक प्रयत्न केले.

असे असले तरी, साम्राज्यातील हिंदु, जैन इत्यादी धर्मांकडे तो सहिष्णू भावनेने पाहात असे. या धर्मांच्या लोकांनाही त्याने राजाश्रय दिला होता. हर्षवर्धन एक दानशूर राजा होता. दानधर्म करताना त्याने धार्मिक भेदभाव कधी केला नाही. दर पाच वर्षाला प्रयाग येथे 'महामोक्ष परिषद' भरवीत असे. या परिषदेत आपल्या खजीन्यात गेल्या पाच वर्षापासून जमलेली संपत्ती हिंदू, बौद्ध, जैन साधू संत आणि उपस्थित सामान्य लोकांना, गोरगरिबांना दान म्हणून देत असे. यावेळी सर्व मौल्यवान वस्तू, पैसाअडका दान करण्यात येत असे. अशाच एका सहाव्या मोक्ष परिषदेस हुएनत्संग उपस्थित होता. तो लिहीतो, 'परिषदेसाठी साम्राज्यातील अठरा मांडलीक राजे व पाच लाख लोक हजर होते. या मेळाव्यात हर्षवर्धनाने आपली सर्व संपत्ती दान दिली. इतकी की शेवटी अंगावर परीधान करावयाची वस्त्रे त्याने आपल्या भगीनीकडून मागून घेतली.' या मेळाव्यात हिंदू, बौद्ध, जैन या सर्व धर्मांचे लोक सामील होत असत. तसेच या ठिकाणी प्रथम दिवशी बुद्धपूजा, द्वितीय दिवशी सुर्यपूजा तर तृतीय दिवशी शिवपूजा बांधली जाई. हा मेळावा ७५ दिवसाचा असे. मेळाव्याचा शेवट दान समारंभाने होत असे.

अशाच प्रकारची बौद्ध परिषद भरवून या परिषदेलाही हिंदू, बौद्ध, जैन पंडीतांना पाचारण करण्यात येत असे. तत्कालीन धार्मिक परिस्थितीबाबत हुएनत्संग लिहीतो, 'भारत हा ब्राह्मण देश असून समाजात ब्राह्मणांना आदर होता. धर्मात नवनविन पंथाचा उदय झाला होता. शैव व वैष्ण धर्माचे अनुयायी जास्त होते. हिंदू धर्मात देवी-देवतांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येत असे. शिव, विष्णू व सुर्य यांची मंदीरे उत्तर भारतात तयार केली गेली. वाराणसी बरोबरच उज्जैन, माळवा, जालंदर इत्यादी शैव धर्माची केंद्रे होती. शक्तीची उपासना करण्यात येत असे. पशूबळी, नरबळी प्रथा रूढ होती. तीर्थयात्रा करणा-यांसाठी धर्मशाळा, विश्रामगृहे, निवास, भोजन, रूग्णालये यांची व्यवस्था होती.'

एकूणच हर्षवर्धनाने बौद्ध धर्माचा स्विकार करून बौद्ध धर्माला राजाश्रय दिला असला तरी इतर धर्माबाबत तो सहिष्णू होता. याची साक्ष पटते.

**७) हर्षवर्धनची राज्यव्यवस्था :-**

हर्षवर्धनाच्या काळात गुप्त कालीन प्रशासन प्रचलीत असले तरी त्यात थोडेफार बदल केलेले दिसतात. हर्षाच्या राज्याचे स्वरूप कल्याणकारी असून त्याने स्वतः जनहितासाठी वाहून घेतले होते. त्याने आपल्या दैनंदीन जीवनाचे तीन भाग केले होते.
१) प्रशासनासाठी २) दानधर्मासाठी ३) वर्षभरात ठराविक वेळी राज्यभर फिरून जनतेच्या तक्रारीचे निवारण करणे (लोकोपयोगी कार्य). हर्षवर्धनाचे प्रशासन पुढीलप्रमाणे होते.

**१) राजा -** राजा हा राज्यकारभाराचा केंद्रबिंदू होता. हर्षवर्धन स्वतः अनियंत्रित सत्ताधारी होता. त्याची सत्ता जरी अनिबंध असली तरी त्याने कधी कोणावर जुलूम केला नाही. राजसत्तेवर धर्माचे बंधन होते. कनौज हे त्याच्या राजधानीचे ठिकाण होते. तो स्वतः साम्राज्याचे निरिक्षण करीत असे. राज्यकारभारात मदत करण्यासाठी व महत्त्वाच्या प्रसंगी सल्ला देण्यासाठी 'मंत्रीपरीषद' होती.

**२) मंत्रीपरीषद -** राजाला राज्यकारभारात मदत करणे, प्रसंगी सल्ला देणे ही कामे मंत्रीपरिषदेची होत. आपल्या विभागाच्या कारभारासाठी ते राजाला जबाबदार असत. भण्डी हा त्याचा प्रधानमंत्री होता. याशिवाय महासंधिविग्रहक, महाबलीधिकृत, बृहदश्वार राजपति, विषयपती, मिमांसक, भोगपती, अक्षपटलीक हे त्याचे कांही मंत्री-अधिकारी होत. बाणभट्टाने हर्षाच्या कांही मंत्री-अधिका-यांची नावे दिली आहेत. १) अवंती (परराष्ट्र व युद्धमंत्री) २) सिंहनाद (सरसेनापती), ३) कुंतल (अश्वदल सेनापती) ४) स्कंदगुप्त (गजदल सेनापती), ५) भानू (दफ्तरदार) याशिवाय महासामंत, उपरीक, विषयापती, मिमांसक इत्यादी नावाचा बाणभट्ट उल्लेख करतो. राजाचे कारभारावर जितके नियंत्रण तितकेच मंत्री परीषदेचेही असे.

**३) लष्करी विभाग -** हर्षवर्धन स्वतः उत्तम सेनापती होता. साम्राज्य रक्षणासाठी लष्कराचे महत्त्व त्यास पटले होते. त्यामुळे त्याने चोख लष्कर व्यवस्था निर्माण केली होती. केवळ शूर व योग्य व्यक्तींचीच लष्करात भरती केली जाई. हुएनत्संगाच्या मते, 'हर्षवर्धनाजवळ सहा हजार हत्ती, एक लाख घोडदळ होते.' पायदळाची संख्याही असंख्य होती. बाणभट्ट म्हणतो, 'सैन्याला रोख पगारी दिल्या जात. सैनिकांना गणवेश, शस्त्रे व घोडे सरकार पुरवित असे. सिंध, पर्शिया येथून उत्तम घोड्यांची खरेदी होत असे.' काही शिलालेखात नाविक दलाचाही उल्लेख आला आहे. सैन्याचे संघटन 'महाबलाधिकृत' हा अधिकारी करीत असे तर युद्धघोषणा, तह ही जबाबदारी महासंधीविग्रहक या सैन्यातील प्रमुख अधिका-यांकडे होती. कार्यक्षम लष्कराच्या जोरावरच हर्षवर्धनाने साम्राज्यविस्तार केला.

**४) पोलीस विभाग -** हर्षवर्धनाच्या साम्राज्यात अंतर्गत शांतता व सुरक्षिततेसाठी पोलीस व्यवस्था निर्माण केली होती. पोलीस विभागसुद्धा कार्यक्षम होता. पोलीस विभागाच्या मदतीसाठी गुप्तहेर विभाग कार्यरत होता.

**५) न्याय विभाग -** हर्षवर्धनाच्या काळात राजा हा सर्वश्रेष्ठ न्यायाधीश होता. न्यायालये कार्यक्षम असून गुन्हेगारांना कठोर शिक्षा दिल्या जात असत. फाशी, हद्दपारी, अवयवभंग वगैरे शिक्षांचा अवलंब केला जात असे. बहुसंख्य गुन्हेगारांना अग्निदिव्य करावे लागे. राजद्रोहासाठी देहदंडाची शिक्षा होती. सामान्य गुन्हेगारांना आर्थिक दंड लावला जाई. नितीमत्तेविरूद्धच्या अपराधासाठी शरीरविच्छेद केला जाई. पोलीस खात्याप्रमाणे न्याय विभागासही हेरांची मदत होत असे.

**६) प्रशासकीय विभाग -** हर्षवर्धनाने साम्राज्याचा गाडा व्यवस्थितपणे हाकण्यासाठी गुप्तकाळाप्रमाणे साम्राज्याचे प्रशासकीय विभाग पाडले होते. साम्राज्यामध्ये अनेक प्रांत असत. प्रांताला 'भुक्ती' म्हटले जाई. भुक्ती अनेक 'विषयात' (जिल्ह्यात) विभागलेली असे. विषयाची विभागणी 'पथकात' (तालुक्यात) केलेली होती. त्यालाच 'भोग' असेही म्हटले जाई. खेडे हा प्रशासनातील शेवटचा घटक होता. खेड्याचा कारभार पाहण्यासाठी ग्रामिक (पाटील), शोल्किक (महसूल गोळा करणारा), गौल्मिक (वनसंरक्षक), तलवाटक (जमाखर्च) इत्यादी अधिकारी नेमण्यात येत असत.

**७) उत्पन्नाची साधने -** हर्षाच्या काळामध्ये विविध कराच्या माध्यमातून बरेच धन सरकारी तिजोरीत जमत असे. शेतसारा हे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. साधारणपणे एक षष्ठमांश हिस्सा शेतसारा म्हणून वसूल केला जाई. खाणी, भूमीगत संपत्ती राजाच्या मालकीची असे. आयात निर्यात कररूपानेही तिजोरीत संपत्ती जमत असे. उद्रंग, उपरीकर, हिरण्य, विशेष आज्ञेने वसूल केलेली रक्कम या मार्गानेही सरकारी तिजोरीत धन जमत असे. हे जमलेले धन प्रजेच्या कल्याणासाठी खर्च करण्यात येत असे.

एकंदरीत हर्षवर्धनकालीन प्रशासनाचे पैलू पाहता हर्षाचे प्रशासन उत्तम होते. त्याच्या प्रशासनाचे स्वरूप कल्याणकारी, जनतेचे हीत जोपासणारे होते असेच म्हणावे लागेल.

सम्राट हर्षवर्धनाने आपल्या असामान्य पराक्रमाच्या जोरावर आपले छोटे राज्य मोठे केले. त्याच्या पराक्रमातून समुद्रगुप्ताचे स्मरण होते. तर त्याच्या धार्मिक धोरणाने सम्राट अशोकाची आठवण होते. सम्राट अशोकाप्रमाणेच हर्षवर्धन लोककल्याणी, कनवाळू, काळजीवाहू, अहिंसावादी, धर्मनिरपेक्ष असल्यामुळे अनेकांनी त्यास 'दुसरा अशोक' म्हणून

संबोधले आहे. हर्षवर्धन स्वतः विद्वान, रसिक व उत्तम सेनापती होता. विविध धर्मांचे अनेक विद्वान पंडीत त्याच्या दरबारी आश्रयाला होते. विद्या व कलेचा तो भोक्ता असून दानशूर होता. नालंदा-वल्लभी ही विद्यापीठे त्याकाळात शिक्षणासाठी नावाजली होती. दानशूरतेच्या बाबतीत कर्णानंतर त्याच्यासारखा दानशूर होवून गेला नाही. दरपाच वर्षाला सर्व संपत्ती दान करणारा हर्षवर्धनासारखा राजा जगात शोधून सापडणार नाही. त्याच्या निधनाबरोबरच भारतातील बलाढ्य साम्राज्याचाही शेवट झाला.

## बदामीचे चालुक्य घराणे

दक्षिण भारताच्या इतिहासात जे काही प्रतिष्ठित आणि प्रभावी राजवंश होऊन गेलेले आहेत त्यात चालुक्य नावांचा राजवंश प्रमुख आहे. ह्या घराण्याच्या प्रमुख दोन शाखा आहेत. त्यात बदामी (विजापूर) ची चालुक्य शाखा हिला पूर्वकालीन चालुक्य घराणे म्हटले जाते, तर कल्याणीच्या चालुक्य शाखेला उत्तरकालीन चालुक्य घराणे म्हणून ओळखले जाते. 'चालुक्य' ह्या राजवंशाच्या उत्पत्तीबद्दल एक काल्पनिक कथा तत्कालीन कवी बिल्हण याने आपल्या विक्रमांकदेवचरित ह्या काव्यात सांगितलेली आहे. 'ब्रह्मदेव एके दिवशी संध्याकाळी इंद्राशी गप्पागोष्टी करीत असतांना त्यांनी आपली ओंजळ (दोन्ही हाताचे पंजे एकत्रित करणे, अंजली) पाण्याने भरुन त्याकडे एक कटाक्ष टाकला असता त्यातून एक धष्टपुष्ट योद्धा बाहेर आला. तो योद्धा म्हणजे चालुक्य वंशाचा मूळ पुरूष होय. 'ओंजळीला त्याकाळी 'चुळुक' असे म्हणत. चुळुक शब्दापासून चालुक्य हा शब्दप्रयोग प्रचलित झाल्याचे कवी बिल्हणच्या काल्पनिक काव्यातून समजते. चालुक्य हे मानव्य गोत्री होते. त्यांचा इतिहासाला माहिती असलेला मूळ पुरुष म्हणजेच 'हारीती' हा होता.

बदामीच्या चालुक्याची माहिती देणारी अनेक भौतिक व वाङ्मयीन साधने आहेत. त्यात थेऊरचा शिलालेख, ऐहोळचा शिलालेख, बदामीचा शिलालेख, मिरज ताम्रपट, सांगली ताम्रपट, खेडाचा ताम्रपट आणि रेवतीचा ताम्रपट ही भौतिक साधने तर बिल्हणचा 'विक्रमांकदेवचरित' हा काव्यसंग्रह, चिनी प्रवासी ह्यूएनत्संगचे प्रवासवर्णन, असंख्य दानपत्रे, कन्नड व संस्कृत भाषेतील ग्रंथसंपदा इत्यादी चालुक्यांच्या इतिहासाची साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे चालुक्याचा सुसंघटित इतिहास लिहिणे शक्य झालेले आहे. चालुक्यांच्या कालखंडातील एकही नाणे सापडलेले नाही. ही उणीवही संशोधनाअंती दूर होईल. बदामीच्या चालुक्यांचे राज्यकर्ते आणि त्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यापूर्वी त्यांची वंशावळ पाहू